MMRDA

Mumbai Metropolitan Region Development Authority

प्रसिद्धी पत्रक

मुंबई, १ डिसेंबर, २०१५

# एमएमआरडीएतर्फे महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा कायापालट करण्याबाबत जागतिक स्तरावरील आराखडा स्पर्धेचे आयोजन :

## नॉलेज पार्टनर - ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन मुंबई

धारावी येथील महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा कायापालट करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) जागतिकस्तरावरील आराखडा स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेची सुरुवात १ डिसेंबरपासून होत आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या मध्यभागी असणाऱ्या या उद्यानाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी तांत्रिकदृष्ट्या प्रगत, सौंदर्यदृष्टीने सर्वोत्तम आणि पर्यावरणाला सुसंगत असे बदल सुचविणे अपेक्षित आहेत.

ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन मुंबई या संस्थेची नियुक्ती नॉलेज पार्टनर म्हणून एमएमआरडीएतर्फे करण्यात आली आहे. त्याला अनुसरून ओआरएफ मुंबईतर्फे ही ऑनलाईन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेची सर्व माहिती देणारे www.letsmakemumbai.org हे संकेतस्थळही त्यादृष्टीने सुरू करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे दोन मुख्य उद्देश आहेत. यामध्ये महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा सर्वसमावेशक कायापालट करणे, म्हणजे पर्यावरणाशी सुसंगत असा जंगलाचा विकास करणे, उद्यानातील निसर्ग अभ्यास आणि पर्यटनाला अधिक चालना देणे हा यामागील पहिला उद्देश आहे. त्याचप्रमाणे फक्त पादचारी आणि सायकलस्वारांना वापरता येईल असा बांद्रा-कुर्ला संकुल आणि महाराष्ट्र निसर्ग उद्यान यांना जोडणारा पूल मिठी नदीवर उभारणे हा दुसरा मुख्य उद्देश आहे.

या स्पर्धेत विजयी होणाऱ्या स्पर्धकाला दोन कोटी मुंबईकरांना आवडेल अशी संकल्पना मांडायची आहे. यातून आपले शहर सर्वसमावेशक, निसर्गावर प्रेम करणारे, जगण्यासाठी सुंदर व्हावे अशी अपेक्षा आहे. आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारत अभियान आणि स्मार्ट सिटीच्या मांडणीला अनुसरूनच ही स्पर्धा घेण्यात येत आहे. शहरी जीवन अधिक समृद्धपणे जगता यावे यासाठी उपलब्ध संसाधनांचा कसा सुयोग्य वापर करता येईल यासाठी ही स्पर्धा मदत करेल. लोकांच्या सहभागातून शहराचे भविष्य घडविण्यासाठी प्रोत्साहन देणे, हा यामागचा हेतू आहे.

**महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा प्रस्तावित कायापालट करताना त्यामागे उद्यानाचे खासगीकरण अथवा मनोरंजन उद्यान करण्याचा कोणताही हेतू नाही. सुधारित महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचा अधिकाधिक मुंबईकरांना वापर करता यावा, हाच शुद्ध हेतू आहे.**

महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या कायापालटाचे तसेच त्याला जोडणाऱ्या पादचारी व सायकलस्वारांसाठीच्या पुलाचे आरेखन प्रस्ताव (आराखडे) या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याद्वारे पुढे यावेत, अशी अपेक्षा आहे. असे प्रस्ताव पाठविणाऱ्यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान असणे तसेच संबंधित क्षेत्रातील आरेखनाचा पुरेसा अनुभव असणे अपेक्षित आहे.

स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यांत, पहिल्या टप्प्यांतून निवडण्यांत आलेल्या पाच प्रवेशिकांना त्यांनी तयार केलेले मास्टर प्लॅन (आरेखन नमुने) अधिक विस्तृतपणे विकसित करण्याविषयी सांगण्यात येईल. या स्पर्धेच्या अंतिम विजेत्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) बरोबर काम करण्याची संधी मिळेल. अर्थात उद्यानाचा कायापालट करणारा विजेत्या टीमचा प्रस्ताव अधिक तपशीलवार विकसित करताना, शासनाच्या संबंधित विभागांची परवानगी, पर्यावरणाशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्यात येईल. तसेच, इमारत व बांधकामविषयक नियमांचे पालनही आराखड्यास अंतिम स्वरूप देताना काटेकोरपणे केले जाईल. आवश्यक त्या परवानग्या मिळवून कंत्राटदारामार्फत तो आराखडा प्रत्यक्ष अंमलात आणण्याच्या टप्प्यापर्यंत आणून ठेवण्याचे काम करण्याची संधी विजेत्या टीमला मिळेल.

स्पर्धेच्या नियोजित वेळापत्रकानुसार, पहिल्या टप्प्याचे निकाल १ फेब्रुवारी २०१६ रोजी जाहीर करण्यात येतील तर अंतिम विजेत्याचे नांव २० एप्रिल २०१६ रोजी घोषित करण्यात येईल.

दोन टप्प्यांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेचे परीक्षण एका परीक्षक मंडळाद्वारे करण्यात येईल. या परीक्षक मंडळाचे अध्यक्ष म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त श्री. यु.पी.एस. मदान काम पाहतील. त्यांच्याबरोबरीनेच, महाराष्ट्र निसर्ग उद्यान सोसायटीच्या कार्यकारी मंडळाच्या विद्यमान सभासदांपैकी एक असलेल्या तसेच इतिहासकार-पर्यावरणवादी आणि लेखिका म्हणून सुपरिचित असणाऱ्या डॉ. फिरोजा गोदरेज, विख्यात डच स्थापत्यकार आणि नगर नियोजनकार श्री. टॉन वॅनहोवेन, साबरमती नदीचा चेहरामोहरा बदलून टाकणारे स्थापत्यविशारद तसेच अहमदाबाद येथील सीईपीटी विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. बिमल पटेल, नीरी या संस्थेचे पश्चिम विभागाचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. राकेश कुमार, न्यूयॉर्क येथील प्रसिद्ध नगररचनाकार आणि प्रोजेक्ट फॉर पब्लिक स्पेसेस (पीपीपी) या संस्थेचे उपाध्यक्ष श्री. इथन केन्ट, ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन मुंबईचे अध्यक्ष श्री. सुधींद्र कुलकर्णी, यांचाही या परीक्षक मंडळामध्ये समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अतिरिक्त महानगर आयुक्त श्री. संजय सेठी आणि ओआरएफ मुंबईमधील संशोधक श्री. गौतम कीर्तने या स्पर्धेचे निमंत्रक म्हणून काम पाहतील.

स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यासाठी निवडण्यात आलेल्या पाच टीमना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे मानधन देण्यात येईल. तर दुसऱ्या टप्प्याच्या अखेरीस जाहीर करण्यात येणाऱ्या या स्पर्धेच्या विजेत्या टीमला रोख रुपये ५० लाखांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल.

***

अधिक माहितीसाठी संपर्क – www.letsmakemumbai.org

**Observer Research Foundation Mumbai**

*Ideas and Action for a Better India*

*Knowledge Partner*

एनकेएम इंटरनॅशनल हाउस, पाचवा मजला, १७८, बॅकबे रिक्लमेशन, मुंबई ४०००२०.

संपर्क: गौतम कीर्तने

ईमेल: gautamkirtane@orfonline.org

**फोन** +91-22 61313800/ **भ्रमणध्वनी:** +91 8097080579 **संकेतस्थळ:** www.orfmumbaionline.org